


दैनिक **लोकक्रांतीचा आरंभ**

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार १९ सप्टेंबर २०२४ | अंक २८४● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# फडणवीसांना गुडघे टेकवायला लावणार, मनोज दादा जरांगे पाटील यांचा इशारा

मुख्यमंत्री योग्य निर्णय घेतील, असं शिंदेंचे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले आहेत. महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका अवघ्या सव्वा 2 महिन्यांवर आहे. विधानसभेची आचरसंहिता निवडणुकीचा घोषणा पुढच्या 15 दिवसांत म्हणजे ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात होईल. खरं निवडणुकीची तयारी, जरांगेंनीही केली आहे. महायुतीचे 113 आमदार पाडण्याचा इरादा त्यांनी बोलूनही दाखवला मात्र, त्याआधी आपण सरकारला शेवटची संधी देत असल्याचं जरांगेंच म्हणणं आहे.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या दिवसापासून जरांगेंनी पुन्हा आमरण उपोषण सुरु केलं आहे. विधानसभा निवडणुकीआधी सरकारला शेवटची संधी असल्याचं सांगत, जरांगेंनी सरकारला शेवटचा अल्टिमेटम दिला आहे. जर मागण्या मान्य झाल्या नाही तर, फडणवीसांसह भाजपला गुडघे टेकवायला लावणार, असा इशाराच जरांगेंनी दिला आहे. जरांगेंचं हे 6 वं आमरण उपोषण सुरु झालं आहे. जरांगे पाटलांच्या 3 प्रमुख मागण्या आहेत. मराठा-कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढा. दुसरी मराठ्यांच्या कुणबी नोंदींवरुन सगेसोयऱ्यांनाही आरक्षण देण्याची अंमलबजावणी करा आणि



तिसरी हैदराबादसह सातारा संस्थान आणि बॉम्बे गॅझेट लागू करा.जरांगेंची मागणी स्पष्ट आहे, की मराठा समाजाला कुणबी अर्थात ओबीसीतून आरक्षण द्या. त्याचसंदर्भात, जरांगेंचा मुंबईच्या दिशेनं निघालेला मोर्चाला, मुख्यमंत्री शिंदेंनी सगेसोयऱ्यांची अधिसूचना काढून शांत केला होता. आता जरांगेंचा सवाल आहे, की अधिसूचना काढली मग सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी का नाही ? 'महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो तुम्ही खड्ड्यात जा, तुमच्या राजकारणाशी मला काही देणं-घेणं नाही. मात्र मराठ्यांना सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी हवी, ही मराठा समाजाची देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी आहे.', असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार हल्लाबोल केला.




## पिठ्ठी येथे जय हनुमान गणेश मित्र मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन

**पाटोदा: ( प्रतिनिधी)**

गणेश उत्सव जवळ आला की युवकांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण होत या काळामध्ये गणेश मंडळ विविध सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करताना आपण पाहत असतो. त्याचप्रमाणे जय हनुमान गणेश मित्र मंडळ भोंडवे वस्ती येथे गेले दहा दिवसात विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले होते. त्यामध्ये लिंबू चमचा, संगीत खुर्ची, खो-खो, कबड्डी,अश्या अनेक खेळांचा समावेश करून यामध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्याला आज बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य मा. बाळासाहेब खोमणे, मा.महेश भोंडवे, व. गोपीनाथ भोंडवे, युवा पत्रकार नितिन भोंडवे,भीमराव भोंडवे,विनोद भोंडवे (पाटील) आकाश सोनसळे,आकाश भोंडवे,पूनाजी वादगे,भागवत काळे,नितिन भोंडवे,ओमकार भोंडवे, धनंजय भोंडवे,शंतनु भोंडवे,ओमकार काळे ,आदी. मान्यवर उपस्थित असून गणेश मित्र मंडळाची कमिटी व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले...

## मतदार जनजागृती कार्यक्रम–विधानसभा निवडणूक

## मतदान यंत्र प्रात्यक्षिक व प्रचार वाहनयात्रेचा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते शुभारंभ

**बीड (वार्ताहर)**

बीड दि. 18 :- आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2004 च्या अनुषंगाने मतदारांमध्ये मतदान यंत्र प्रात्यक्षिक व प्रचार कार्यक्रम यासाठी जिल्ह्यातील 6 विधानसभा मतदारसंघांमध्ये वाहन रॅली काढण्यात येणार आहे. याचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बीड अविनाश पाठक यांच्या हस्ते करण्यात आला. होऊ घातलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2004 च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग तसेच उपमुख्य निवडणूक निर्णय अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी राज्यभरामध्ये मतदारांमधील मतदान जागृतीसाठी मतदान यंत्र प्रात्यक्षिक व प्रचार कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत त्यानुसार जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये हे प्रात्यक्षिक व प्रचार अभियान होणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी आज बीड येथे प्रचार प्रसिद्धी वाहनास हिरवी झेंडी



दाखवली याप्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे तसेच बीड विधानसभा मतदारसंघाचे नायब तहसीलदार सुहास हजारे, रवींद्र कुलकर्णी विश्वजीत लांडगे' रवी पांगरे, शेख जफर आदींची उपस्थिती होती. जिल्ह्यात प्रचार व प्रसिद्धीसाठी या प्रकारची वीस मतदान यंत्र वितरित करण्यात आली आहे 19 सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत मतदारांमध्ये ज्यानं जागृती करण्यासाठी सदर मतदान यंत्र यांचे प्रात्यक्षिक या मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅनमार्फत करण्यात येत आहे या जनजागृती अभियानाचा सर्व मतदारांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## महात्मा फुले विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्रामदिन साजरा



घनसावंगी तालुक्यातील पानेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्रामदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अमोलभैय्या तिडके यांच्या हस्ते झाले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव श्री. आत्मारामजी तिडके हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. ए. ए. तिडके, पर्यवेक्षक श्री. एस. एस. गोसावी हे होते. अध्यक्षांनी व प्रमुख पाहुण्यांनी थोर नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली व विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. अध्यापक श्री. एन. आर. माटे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. आर. ए. आंधळे यांनी केले. कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार श्री. आर. वाय. चौधरी यांनी मानले.

## ग्रामरोजगार सेवक संघटनेचे काम बंद आंदोलन–कॉ. भाऊराव प्रभाळे.




बीड प्रतिनिधि -दिनांक 18 सप्टेंबर, रोजी रोजगार सेवक संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.बीड जिल्ह्यातील रोजगार सेवकांना मागील ऑक्टोबर 2023 पासून रोजगार सेवकांचे मानधन मिळालेले नाही. 2016 पासून निर्वाह भत्ता (TADA) एफ टी ओ तयार केलेल्या असून मागणी केलेले असताना मिळालेला नाही. मजुरांना मजुरी मिळते, वैयक्तिक लाभार्थ्यांना कुशल बिले मिळतात, ग्रामपंचायतला सार्वजनिक कामाचे कुशल मिळतात मग रोजगार सेवकांना एक एक वर्षापासून मानधन मिळत नाही. बीड जिल्ह्यातील एकाही तालुक्याला वर्षभरापासून मानधन मिळालेले नाही याला जबाबदार काही तालुक्यातील सहाय्यक कार्यक्रमाधिकारी कर्मचारी आहेत यांच्याकडे वारंवार मागणी करून तक्रारी देऊन उपयोग झाला नाही व हे रोजगार सेवकांच्या मागणीला जुमानत नाही. प्रत्येक ग्रामसभेला जिल्ह्यातील एकूण 15% रोजगार सेवकांच्या विरोधात बोगस ठराव घेतल्याचे पंचायत समित्यांना सादर होतात. त्यापेक्षा अधिक अतिरिक्त नियम बाहेर नेमले जातात. हे सर्वांनी आम्ही अनेक वर्षापासून सहन करत आहोत त्यामुळे जिल्हा संघटनेने संपूर्ण जिल्हाभर काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मागण्या. येत्या दोन दिवसाच्या आत रोजगार सेवकांचे मानधन त्यांच्या वैयक्तिक खात्यामध्ये जमा करा. 2016 पासून थकलेला डी ए डी ए तात्काळ मानधनासोबत देण्यात यावा. नियमबाह्य घेतलेले अतिरिक्त रोजगार सेवक काढून टाकावे. बोगस ग्रामसभा दाखवून नियुक्त केलेल्या रोजगार सेवकांची व त्या ग्रामसभेची उच्चस्तरीय चौकशी करावी. वरील वरील मागण्या मंजूर न झाल्यास बेमुदत काम बंद आंदोलन चालूच राहील व लोकशाही मार्गाने उपोषण व निदर्शने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केली जातील असे निवेदनामध्ये म्हटले आहे. निवेदनावर कॉ. भाऊराव प्रभाळे जिल्हाध्यक्ष रोजगार सेवक संघटना, सिद्धेश्वर खांडे मराठवाडा प्रमुख रोजगार सेवक संघटना, जिल्हा सचिव अंगद खवतड, तालुकाध्यक्ष मोहन कचरे, श्रीराम घोलप, रामदास कदम ,हनुमंत घिगे, श्रीमंत पवार, रामदास कदम, सुरवसे, भडके, विष्णू कुराडे, पिराजी बहिर, मुकेश भोकरे, मोहिते इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. निवेदनातील मागण्या मंजूर न झाल्यास तात्काळ मोठ्या स्वरूपामध्ये आंदोलन उभे करण्याचा इशारा दिला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी घोषणा दिल्यामुळे बाळासाहेब गरड यांना पोलीस निरीक्षक गोरख दहिफळे कडून अमानुष मारहाण

## सिरसाळा पोलीस स्टेशनचे जातीयवादी पोलीस निरीक्षक गोरख दहिफळे यांच्यावर गुन्हा दाखल करुन तात्काळ हकालपट्टी करा निवेदनाद्वारे मागणी

परळी (वार्ताहर) सिरसाळा पोलीस स्टेशनचे वादग्रस्त जातीयवादी पोलीस निरीक्षक गोरख दहिफळे यांनी गणपती मिरवणुकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची घोषणा दिल्यामुळे सामाजिक संभाजी ब्रिगेडचे परळी तालुकाध्यक्ष बाळासाहेब गरड यांना अमानुष मारहाण केली आहे. ही घटना अत्यंत निंदनीय असून या जातीयवादी पोलीस निरीक्षक यांच्यावर गुन्हा दाखल करून तात्काळ बडतर्फ करावे अशी मागणी करण्यात आली आहे पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनामध्ये समाज बांधवांची मागणी अशी की मागच्या काही महिन्यांमध्ये सिरसाळ्याचे वादग्रस्त पोलीस निरीक्षक



यांनी अनेक तरुणांना धमकावने, मारहाण करणे असे प्रकार सातत्याने जाणीवपूर्वक केले आहेत .पूर्णपणे जातीय द्वेषातून या पोलिस निरीक्षकाचं वागणं व कार्यपद्धती असून अशा जातीयवादी पोलीस निरीक्षकावर गुन्हा दाखल करून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे बीड येथे पोलीस अधीक्षक यांना प्रत्यक्ष भेटून मागणी केली आहे. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेते उपस्थित होते.दोन दिवसात या जातीयवादी पोलीस निरीक्षकावर कारवाई नाही केली तर लोकशाही मार्गाने उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा या प्रसंगी पोलीस अधीक्षक यांना दिला आहे.

# धनगर आंदोलनाकडे पाठ फिरवणाऱ्या आमदाराकडे धनगर समाज पाठ फिरवनार -सकल धनगर समाज

## धारूर चे भूमिपुत्र यशवंत गायके पंढरपूर मध्ये करतात धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी आमरण उपोषण,

**बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी** महाराष्ट्रात 75 वर्षापासून एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू असताना धनगर समाजाला या आरक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात सर्वच पक्षाचे सरकार आले मुख्यमंत्री झाले. ज्या ज्या वेळी विरोधी पक्षात जे पक्ष होते त्यांना धनगर समाजाबद्दल आत्मीयता होती आरक्षणाची ओढ होती परंतु सत्तेमध्ये बसतात या प्रश्नाचा विसर झालेला दिसतो. म्हणून समाज बांधवांना 75 वर्षापासून वेगवेगळी आंदोलन, उपोषण ,रास्ता रोको, निवेदन इत्यादी लोकशाही मार्गाने आरक्षणाचा लढा द्यावा लागत आहे. सरकारने समाजाच्या माथी वेगवेगळे अहवाल, समित्या लादल्या. जसे की फडणवीस




सरकारने सत्तेमध्ये येतात पहिल्या कॅबिनेटमध्ये समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करू असे आश्वासित केले. परंतु सत्ता येतात टीस अहवालाच्या नावाखाली पूर्ण पाच वर्ष वाया घालवली. नंतर ठाकरे सरकार आले त्यांनी समाजाचा प्रश्न मार्गी लावला नाही. पाठीमागे साठ वर्ष काँग्रेस चे सरकार होते परंतु त्यांनाही हा प्रश्न सोडवता आला नाही. किंबहुना प्रश्न रेंगाळत ठेवण्यात मोठेपणा वाटत होता. आता शिंदे सरकार आले त्यांनीही शिंदे समिती स्थापन केली. परंतु या समित्या स्थापन करून वेळ काढू पणा करण्याचे धोरण सरकार करत आहे म्हणूनच मागील दहा दिवसापासून पंढरपूर येथे समाज बांधवांचे मोठे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाकडे सत्तेतील सर्वच आमदार किंवा आमदारकीचे बाशिंग बांधून स्वप्न पाहणारे नवीन आमदार यांना या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पेनातील साई संपली आहे, की कागद अपुरे आहेत याचा प्रश्न समाज बांधवांना पडत आहे. खरे तर महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात धनगर समाज आहे या सर्वांची यांना गरज नाही का. की फक्त निवडणुकीच्या तोंडावरच समाजाचे मेळावे घेऊन समाजाचे आपण कैवारी आहोत असे भासावण्याचा यांचा प्रयत्न असतो. गरज आहे ती सर्व आमदारांनी या आंदोलनाला प्रत्यक्ष भेट देऊन पाठिंबा दर्शवण्याची. जर आमदारांना पाठिंबा देण्यासाठी वेळ भेटत नसेल किंवा जाणीवपूर्वक या आंदोलना कडे पाठ दाखवण्याचे काम सत्तेतील आमदार व स्वप्न पाहणारे आमदार करत असतील तर संपूर्ण महाराष्ट्रातील धनगर समाज बांधव या पक्षांना किंवा पक्षाच्या तिकिटावर लढणाऱ्या उमेदवारांना येणाऱ्या निवडणुकीत पाठ दाखवल्याशिवाय राहणार नाही. असा निर्धार संबंध महाराष्ट्रातील धनगर समाज करत आहे. आज पर्यंत बीड जिल्ह्यातील किती आमदारांनी पंढरपूर येथील आंदोलनाला भेटी दिल्या यावर समजाची नजर असून याची किंमत नक्कीच येणाऱ्या निवडणुकीत उमेदवारांना मोजावी लागेल.

# जोमेगावकरांनी गणरायाला दिला आगळावेगळा निरोप...

## "ना डिजे" "ना पोलीस बंदोबस्त"




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील जोमेगाव येथे श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक "बिना डिजे" बिना पोलिस बंदोबस्ता विना पार पडल्याचे पहावयास मिळाले.

हल्ली आपण बेधुंद अवस्थेत डीजेच्या तालावर तरुण मंडळींना नाचतांना आपण अनेक वेळा पाहिलं आहे.पण त्याला वेगळा फाटा देत जोमेगावकऱ्यांनी मात्र श्री गणेशाच्या विसर्जना वेळी टाळ मृदंगाच्या तालावर भजन करत अगदी आनंदी उत्साहात टाळ, मृदुंगाच्या गजरात, गावातील महिला, पुरुष मंडळी, लहान मुले, मुली, अबाल वृध, मंडळीनी, भक्ती भावाने, निरोप दिला सदरिल मिरवणूक "ना डिजे " "ना पोलीस बंदोबस्त" अत्यंत शांततेत पार पडली. यावेळी पोलीस पाटील मारोती पांचाळ,विनोद शिंदे,जळबा शिंदे,हणमंत शिंदे,संतोष जाधव. अचुत शिंदे,गुलाब पाटील रामेश्वर शिंदे पिटुं पांचाळ वारकरी गणेश भक्त मंडळ ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ.अशोक बेलखोडे यांना 'मराठवाडा भूषण' पुरस्कार जाहीर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : मराठवाडा समन्वय समिती, पुणे च्या वतीने देण्यात येणारा सामाजिक क्षेत्रातील 'मराठवाडा भूषण' पुरस्कार किनवट येथील जेष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांना नुकताच जाहीर झाला आहे.हा पुरस्कार येत्या दि.१९ ला पुण्यात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



मराठवाडा समन्वय समितीच्या वतीने २००९ सालापासून दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिर पुणे, येथे मराठवाडा मुक्ती दिन महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमात मराठवाड्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्वान व्यक्तींना पुण्यातील तमाम मराठवाडा वासीय व पुणेकरांच्या वतीने 'मराठवाडा भूषण' पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.

डॉ.बेलखोडे हे सामाजिक क्षेत्रातील एक नामवंत व्यक्तिमत्व आहेत. ते मागील तीस वर्षाहून अधिक काळ नांदेड जिल्ह्यातील किनवट परिसरातील आदिवासी समाजासाठी खूप मोठे सेवा कार्य करत आहेत. समाजातील विविध घटकांसाठी सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयी डॉ.बेलखोडे हे करत असलेले सेवा कार्य अतिशय प्रेरणादायी आहे. त्यांच्या बहुमूल्य योगदानासाठी 'मराठवाडा समन्वय समिती' पुणे, यांच्या वतीने २०२४ सालातील सामाजिक क्षेत्रातील 'मराठवाडा भूषण' पुरस्कार डॉ.बेलखोडे यांना प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. गुरुवारी(ता.१९) सायंकाळी सहा वाजता बालगंधर्व रंगमंदिर, पुणे त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

मागील वर्षापर्यंत दरवर्षी १७ सप्टेंबर रोजीच हा महोत्सव साजरा करण्यात येत होता. मात्र, यावर्षी १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी म्हणजेच गणपती विसर्जन आहे, त्यामुळे यावर्षीचा कार्यक्रम १९ सप्टेंबर रोजी आयोजित केला आहे,अशी माहिती मराठवाडा समन्वय समिती, पुणे चे अध्यक्ष राजकुमार धुरगुडे पाटील व उपाध्यक्ष किशोर पिंगळीकर यांनी कळविली आहे.

# गेवराई भारतीय जनता पार्टी तालुका उपाध्यक्ष पदाचा अशोक घोलप यांनी दिला राजीनामा

## अण्णा जो तुमचा निर्णय तो आम्हाला मान्य असेल. अशोक घोलप.

**बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी**
गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या कार्यकर्ते मध्ये सध्या लक्ष्मण पवार ही निवडणूक लढवणार नसल्याचे दिसून आल्यानंतर. आता कार्यकर्त्यांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर गेवराई विधानसभा मतदारसंघाचे कार्यकर्ते एकनिष्ठ कार्यकर्ते अशोक मामा घोलप. यांनी आपल्या उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. सध्या कार्यकर्ते यांचं.राजीनाम सत्र



चालू आहे. लक्ष्मण पवार हे सर्वसामान्य जनतेसाठी सातत्याने लढत आहेत. गोरगरीब जनतेच्या सुखा दुखासाठी हे मतदारसंघासाठी लाभलेले नेतृत्व आहे. गेवराई विधानसभेच्या राजकारणात त्यांची विकास पुरुष व कार्यसम्राट या नावाने त्यांची ओळख आहे. गेवराई मध्ये लक्ष्मण आण्णा पवार यांच्या निवासस्थानासमोर आज गेवराई विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा मोठा मेळावा भरला होता या ठिकाणी कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले होते. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई मतदार संघातील कार्यकर्त्यांना. एक तारखेचा निर्णय दिला आहे यानंतर एक तारखेच्या निर्णयानंतर अण्णा आपली भूमिका जाहीर करणार आहेत. सध्या गेवराई मतदार संघातील कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. यावेळी लक्ष्मण अण्णा पवार यांनी आपल्या भाषणात म्हणाले आहेत की पंडित मुक्त गेवराई करूयात असा संदेश कार्यकर्त्यांना दिला आहे. यावेळी गेवराई भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष अशोक घोलप यांनी राजीनामा दिला आहे.

# दीड लाख भाविकांना नवसाच्या मोदकाचे वाटप,विघ्नहर्ता चिंतामणी गणपती

हिंगोली :- (प्रतिनिधी ) विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या भाविकभक्तासाठी दीड लाख नवसाच्या वाटप करण्यात आले. असल्याची माहिती विघ्नहर्ता चिंतामणी समितीकडून सांगण्यात आले आहे. या वेळी दर्शनासाठी कर्नाटक आंध्रप्रदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दोन लाख दर्शनासाठी भाविकांनी उपस्थिती लावली होती. शहरात एक किलोमीटर लांब दर्शनासाठी रात्रीपासूनच लागली होती. परंतु सकाळी आठ वाजता विघ्नहर्ता गणपती मंदिरात आरती झाल्यानंतरच नवसाच्या मोदकाचे वाटप होत असते जोपर्यंत भाविक काही रांगेतच उभे होते. ज्यांना



दर्शन घ्यायचे ते लवकर निघून गेले परंतु ज्या भाविकांना नवसाचे मोदक घ्यायचा आहे. तो मोदक वाटप आरती झाल्यानंतर रांगेला सुरुवात होते. या रांगेला दोन लाख भाविक दर्शनासाठी थांबले होते. हिंगोली करा कडून अन्नदान मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून त्यात जेवण दूध चहा कॉफी नाश्ता पाणी असे अनेक उपक्रम येथे राबविल्या जातात. राज्यभर हिंगोली चे नाव अन्नदाता म्हणून अनेक वर्षापासून प्रसिद्ध झाले आहे. याबरोबरच आरोग्य विभागाची ही टीम सज्ज असते त्यात चक्कर येणे शुगर हा प्रॉब्लेम आल्यास त्याची तत्पर सेवा करण्याकरिता भाविकांसाठी हिंगोली कर सज्ज असतात. फोर व्हीलर पार्किंग साठी राम लीला मैदान येथे करण्यात आली होती. हजारो गाड्या त्या स्पार्किंग मध्ये फ्री मध्ये लावल्या जातात. हिंगोलीतील सर्व दुकान रांगेच्या आजूबाजूला बंद असतात सेवेकरी म्हणून दि. 17 सप्टेंबर रोजी दिवसभर रांगेत कोणी साफसफाई करेल तर कोणी पाणी नाश्ता वाटपाचे काम हिंगोली कर यांचे चालू असते. सेवक म्हणून हिंगोलीकरांची चांगली ओळख आहे. विघ्नहर्ता चिंतामणी मंदिराच्या समितीकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या सुविधा देत असतात. समितीकडून यावेळीही दहा दिवसापासूनच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी जेवणाची व्यवस्था मंदिराच्या बाजूलाच करण्यात आली होती दररोज 5000 भाविक भोजन करीत होते. पुढील वर्षी आणखी काय उपाययोजना कराव्यात ती समिती काही दिवसात बैठक घेऊन करण्यात येणार असल्याचे समितीकडून सांगण्यात आले आहे.

# निजामकालीन नेकनुर, पिंपळनेर पोलिस ठाण्यांच्या नविन इमारतींचे बांधकाम सुरु करा; पोलिस निवासस्थानांचे काम सुरु करा; मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे:- डॉ.गणेश ढवळे

बीड :- गेल्यावर्षी १६ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवाचे निमित्त साधून छत्रपती संभाजी नगर मध्ये मंत्री मंडळाची बैठक घेतली होती.यात सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मराठवाड्यातील निझामकालीन ७० पोलिस ठाण्यांच्या ईमारती बांधण्याची घोषणा केली होती.मात्र अद्याप निझामकालीन पोलिस ठाण्यांसाठी नवीन ईमारत अथवा दुरूस्तीची कामे सुरू करण्यात आली नाहीत.बीड तालुक्यातील नेकनुर आणि पिंपळनेर पोलिस ठाण्यांची दुरावस्था झाली असुन नविन इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा तसेच पोलिस निवासस्थानांचे काम बीडमध्ये सुरू असुन अंबेजोगाई आणि परळी येथील निवासस्थानांचे काम अद्याप सुरू करण्यात आले नाही ते सुरू करण्यात यावे तसेच नेकनुर पोलिस ठाण्यातील दोन पोलिस उपनिरीक्षक आधिका-यांच्या बदल्या झाल्या असुन दीड लाखांच्या वर




लोकसंख्या असलेल्या पोलीस ठाण्याचा अतिरिक्त ताण कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत असुन तातडीने पदांची नियुक्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, शिवकुमार शर्मा, मुबीन शेख, बप्पासाहेब पवार आदी सहभागी होते. नेकनुर पोलिस स्टेशनचे ६ कोटी ३४ लाख पडुन; इमारतीच्या बांधकामाचे घोंगडे भिजत , पत्र्याच्या शेडमध्ये कामकाज नेकनुर पोलिस ठाण्याची ईमारत निजामकालीन असुन कालबाह्य झाली आहे.नविन ईमारत बांधकामासाठी सन २०२१-२२ मध्ये ६ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन २ वर्षं उलटुनही अद्याप काम सुरूच नाही. सध्याची ईमारत पावसाळ्यात गळत असुन अपुरी पडत असल्याने पत्र्याच्या शेडमध्ये कामकाज सुरू आहे.त्यामुळे तातडीने नविन ईमारतीचे बांधकाम सुरु करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. २ पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्याने पदे रिक्त; कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण २ पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्या झाल्याने पदे रिक्त आहेत तसेच पोलिस ठाणे स्थापनेच्या वेळी जी कर्मचारी संख्या होती आजही तेवढीच आहे.नेकनुर पोलिस ठाण्यांतर्गत ९७ गावांचा समावेश असुन जवळपास दीड लाख लोकसंख्येसाठी २आधिकारी आणि ४४ कर्मचारी कार्यरत आहेत.या पोलिस स्टेशन अंतर्गत धुळे - सोलापूर आणि अहमदपूर ते अहमदनगर दोन राष्ट्रीय महामार्ग जात असुन याठिकाणी वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असुन अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. नुकत्याच या ठिकाणाहून २ पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्या झाल्याने ईतर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत असून तातडीने पदांची नियुक्ती करण्यात यावी. पोलिस वसाहतीसाठी ३०० कोटींच्या घोषणेचं काय झालं?? बीड मधिल कामे सुरू परंतु अंबेजोगाई व परळी येथील कामे अद्याप सुरुच नाहीत गेल्यावर्षी १६ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री म एकनाथजी शिंदे यांनी बीड जिल्ह्याला १००० कोटींच्या प्रकल्प व विकास कामांची घोषणा केली होती.त्यात अंबेजोगाई, परळी व बीड मध्ये पोलिस निवासस्थानांसाठी ३०० कोटींची घोषणा केली होती.बीडमध्ये काही निवासस्थानांचे काम सुरू आहे मात्र परळी आणि अंबेजोगाई येथील निवासस्थानांचे अद्यापही काम सुरूच नाही.त्यामुळे तातडीने काम सुरू करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

## महावितरण कार्यालय पाटोदा चा राजा गणेशाला थाटात निरोप





पाटोदा प्रतिनिधी: सालाबादप्रमाणे ह्या वर्षी ही महावितरण कार्यालय पाटोदा येथे राजा गणेश्याच उत्साहात आगमन झाले होते. गणेशाच्या आगमनाने कार्यालयात नवी दिश्या उमलून आली होती गेले दहा दिवस सर्व गणेश भक्तांनी सेवा केली आणि शेवटी बाप्पाची जाण्याची वेळ आली.आणि आज त्याच थाटात राजा ला निरोप देण्यात आला .यावेळी कर्यालामध्ये महाप्रसादाचे नियोजन करून पाटोदा शहरात भव्य मिरवणूक कडण्यात आली यावेळी पाटोदा सब डीव्हिजन चे उप कार्यकारी अभियंता मा .सावकारे,पाटोदा युनिट एक चे साह्यक अभियंता मा.मुंडे,कनिष्ठ अभियंता मा.घाडगे, मा.कदम व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## शिवनेरी ग्रुप पिंपळनेरचे अण्णा डांगेसह युवकांचा जय शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश

बीड प्रतिनिधी लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचे विचार पुढे घेऊन समर्थपणे वाटचाल करत असलेल्या जय शिवसंग्रामचे संस्थापक रामहरी मेटे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पिंपळनेर सर्कल मधील शिवनेरी ग्रुपचे अण्णासाहेब पिनू डांगे यांच्यासह असंख्य युवकांनी जय शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशाचे जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी जाहीर स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे 18 सप्टेंबर रोजी सकाळी जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपळनेर सर्कलची बैठक झाली.



यावेळी सर्वांनू मते अण्णासाहेब डांगे पिनू यांनी आपल्या असंख्य समर्थक युवकांसह जय शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामध्ये अण्णा डांगे यांच्यासह बाबुराव लोंढे, अमोल ढेपाळे, सुरज शिरसाट, भागवत काकडे, अनंता जगताप, सोमनाथ ढगे, पवन जवळकर,नितीन माळी, रामू साळवे, अमोल बन, बाळासाहेब ढेपाळे, बाळू तिळगुळ, भैय्या साळवे, बाबासाहेब भारे या सर्वांचे जय शिवसंग्राम मध्ये संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करत पक्षामध्ये प्रवेश दिला.

यावेळी मार्गदर्शन करताना जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे म्हणाले, मी लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या विचारांना समर्थपणे पुढे घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहे.त्यांनी पाहिलेलं मराठा आरक्षणासहित बहुजन समाजाच्या विकासाचे स्वप्न मी जय शिवसंग्राम च्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र मधून माझ्या या विचाराला उस्फूर्तपणे पाठिंबा आणि पाठबळ मिळत आहे. बीड जिल्ह्यामध्ये आता माझ्या भूमिकेला तरुणांनी आणि मेटे साहेबांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या समर्थकांनी स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. आपल्यासारखे युवक जय शिवसंग्राम मध्ये दाखल होत आहेत. हा खरा मेटे साहेबांच्या विचारांचा विजय आहे. पुढे भविष्यात आपल्या सर्वांना राजकीय ताकद देऊन विकासाची कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेल, असा शब्द यावेळी त्यांनी दिला. या बैठकीला जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ मोरे, इम्रान जागिरदार, सागर नवले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## सोयाबीनला दहा हजार व कापसाला पंधरा हजार रूपये हमीभाव द्या - संभाजी ब्रिगेडची मागणी

### पाटोदा येथे शेतकऱ्यांचे निदर्शन आंदोलन

अंबाजोगाई (वार्ताहर) सोयाबीनला १० हजार व कापसाला १५ हजार रूपये हमीभाव तसेच २०२३ चा पिक विमा द्यावा, सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरसकट कर्ज माफी करावी या प्रमुख मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुक्यातील पाटोदा येथे मंगळवारी निदर्शन आंदोलन करण्यात आले. याप्रश्नी अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी आणि कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांना निवेदन देण्यात आले होते. याबाबत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा सचिव नारायणराव मुळे, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर मिसाळ, जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब पवार, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.अश्विनीताई यादव लोमटे, अंबाजोगाई तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष केशव टेहरे, तालुकाध्यक्ष पृथ्वीराज सोनवणे यांनी तालुक्यातील पाटोदा येथे मंगळवार, दिनांक १७ सप्टेंबर रोजी निदर्शन आंदोलन केले. या आंदोलनास शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनुरथ काशिद यांनी ही सहभागी होत पाठिंबा दर्शविला. सदर आंदोलनात पाटोदा व पंचक्रोशीतील विविध गावांतील शेतकऱ्यांच्या विषयी प्रामाणिक तळमळ असणारे सामाजिक कार्यकर्ते ॲड.भैरवनाथ देशमुख, गोविंद कदम, सुभाष उगले, बाबुराव तोडकर, नामदेव नरारे, दिपक जामदार, अनिल सरवदे, अरूण पवार, हेमराज देशमुख, देवानंद पाडुळे, अंगद कांबळे, मारूती मुळे, बाळासाहेब घोरपडे, श्रीकृष्ण जामदार, बालासाहेब घोरपडे, राम गवळी, श्रीराम जामदार, चंद्रकांत सरवदे यांच्यासह शेतकरी व संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे मागण्यांचा फलक घेऊन, घोषणा देत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संभाजी ब्रिगेडच्या वतीने अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी आणि कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांना बुधवार, दिनांक ४ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. सदरील निवेदनात नमूद केले आहे की, केंद्र शासनाने सन २०२४ - २०२५ या वर्षासाठी सोयाबीन पिकाला ४८९२/- रूपये व कापूस या पिकाला मध्यम स्टेपला ७१२१/- रूपये व कापूस पिकाला लांब स्टेपला ७५२१/- रूपये हमीभाव दिला आहे. म्हणून आपण ही सोयाबीन व कापूस हमीभावाने खरेदी करावे. कारण की, जे व्यापारी सोयाबीन व कापूस हमीभावापेक्षा कमी भावाने खरेदी



करीत आहेत. त्यांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. आपण हमी भावापेक्षा कमी भावाने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर जर गुन्हे नाही दाखल केले. तर संभाजी ब्रिगेड (ता.अंबाजोगाई जि.बीड) यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी नोंद घ्यावी. सर्व परवानाधारक आडते व व्यापाऱ्यांना हमीभावाचे परिपत्रक काढून कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई यांनी कळवावे. सर्व पिकांच्या हमीभावाचे परिपत्रक काढावे. असे नमूद केले आहे. निवेदनासोबत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती हमी भावाचे परिपत्रक ही जोडले आहे.

शेतकरी विधानसभेला मतदानातून धडा शिकविणार : शासनाने सोयाबीन पिकाला १० हजार रूपये व कापूस पिकाला १५ हजार रूपये हमीभाव द्यावा., २०२३ चा पिक विमा द्यावा., सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे. आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी. अन्यथा आगामी विधानसभेला शेतकरी मतदानातून महायुती सरकारला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. याची राज्य शासनाने नोंद घ्यावी अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्य सरकार, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विरोधात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोजदादा आखरे व महासचिव सौरभदादा खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात यापुढे आणखीन तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- प्रविण ठोंबरे
(जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, बीड.)

## माधव तात्या निर्मळ यांनी घेतली कै शंकर अण्णा दराडे कुटुंबियांची सांत्वन पर भेट

माजलगाव प्रतिनिधी :- बुधवार दि.18 माजलगाव विधानसभा मतदारसंघातील घळाटवाडी ता.माजलगाव येथील न्यूज पेपर डिजाईनर. पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य अंगद दराडे., मुबंई पोलीस ओमप्रकाश दराडे यांच्या वडिलांचे दीर्घ आजाराने निधन झालेले होते त्यानिमित्त दराडे कुटुंबियाचं सांत्वन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मा.श्री. माधव तात्या निर्मळ व कल्याण भाऊ आबूज यांनी केले .यावेळी सोबत बाळासाहेब क्षीरसागर,कल्याण शेप.आप्पा कुर्पे. यांच्या सह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. पत्रकार तथा न्यूज पेपर डिजाईन अंगद दराडे माध्यमाशी बोलतांना



अंत्यत भावुकतेने मनोगत व्यक्त करत म्हणाले संकट काळी व दुःखाच्या दिवसामध्ये आदरणीय माधव तात्यासाहेब निर्मळ यांनी भेट घेऊन आधार दिला तळागळा तील वाडया वस्तीवरील सर्व सामान्य माणसाच्या सुखा दुःखा मध्ये सामील होणारे सर्व समावेशक अगदी साधारनातीलं साधारण माणसांना कार्यकर्त्यांना धीर आधार देणारे माधवतात्यासाहेब निर्मळ आहेत. मी व दराडे परिवार सदैव त्यांचा ऋणी राहील असं पत्रकार तथा युवा लेखक साहित्यिक कलावंत अंगद दराडे यांनी त्यांच्या भावांना व्यक्त केल्या.

## अग्निशमन दलाकडून स्थानिकांचे आभार

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड-किनवट : तालुक्यातील इस्लापूर रेल्वे स्टेशन येथे मालगाडीतील कोळशातुन धूर निघत असल्याची माहिती रेल्वे विभागाने अग्निशामन दलाला दिली पण आग विझवायला गेलेली अग्निशामक दलाची गाडीच फसल्याची घटना इस्लापूर रेल्वे स्टेशन येथे दिनांक -१३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजल्याच्या सुमारास घडली.

सविस्तर माहिती अशी की, आपण अनेक वेळा कोणतीही दुर्घटना व जाळपोळीचे प्रकरण झाल्यास अगोदर अग्निशामन दलाच्या गाडीला पाचरण करतो अशीच एक घटना किनवट तालुक्यातील इस्लापूर रेल्वे स्टेशन येथे कोळशाच्या गाडीतून धूर निघत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्टेशन मास्तर नितेश कुमार यांनी किनवट येथील अग्निशामन दलाच्या गाडीला बोलावले व कोळशाच्या गाडीतून निघणारा धूर विझवला. पण



तीच गाडी रेल्वे टेशन बाहेर उभी असलेल्या जमिनीत फसल्याची घटना घडली.अग्निशामन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना व रेल्वे विभागाला याबद्दलची माहिती दिली परंतु याचा काहीच फायदा झाला नसल्याने अखेर अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी इस्लापूर येथील स्थानिक लोकांच्या मदतीने गावातीलच जेसीपी बोलावून इमरान शेख,अदनान शेख जेसीबी मालक सचिन पाटील ड्रायव्हर ताहेर इतर स्थानिकांनी अग्निशमन दलाची गाडी काढण्यासाठी मदत करून अग्निशमन दलाची गाडी सुखरूप बाहेर काढली.यावेळी अग्निशामन दलाचे कर्मचारी सटवाजी डोकळे, रविचंद सुकळीकर,अब्दुल रज्जाक यांनी स्थानिक लोकांचे आभार मानून आपली अग्निशामन दलाची गाडी पहाटे ३ वाजता किनवट कडे रवाना केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
गुरुवार १९ सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# राज्यातील शाळांमध्ये मोबाईलवर बंदी आणली पाहिजे, कीर्तनकार इंदोरीकर महाराजांची मागणी

**मुंबई,.(प्रतिनिधी)** मोबाईल हा आपल्या आयुष्यातील जगण्याचा एक अविभाज्य घटक बनला आहे. मोबाईलशिवाय आपल्याला चैन पडणार नाही. प्रत्येक व्यक्ती मोबाईलशिवाय घराबाहेर पडणार नाही. कुठेही बाहेर जायचं असेल तर आपण आधी मोबाईल घेतला ना? याची शहानिशा करतो. अर्थात मोबाईल हा तसा आवश्यक असला तरी त्याचा अतिवापर हा घातक ठरु शकतो. विशेष म्हणजे लहान मुलं आणि विद्यार्थी यांच्याकडून केला जाणारा मोबाईलचा अतिवापर हा त्यांच्यासाठी हानीकारक ठरु शकतो. याशिवाय अनेक शाळांमध्ये शाळा सुरु असण्याच्या कालावधीत शिक्षकांकडूनही मोबाईल वापरला जातो. या दोन्ही गोष्टींवर प्रसिद्ध कीर्तनकार इंदोरीकर महाराज यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी शाळेत थेट मोबाईल बंदी करावी, अशी मागणी आपल्या कीर्तनातून केली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान जसं वाढत आहे, तसं जग जवळ येत आहे, असं मानलं जात आहे. मोबाईल आणि इंटरनेटमुळे जग तर प्रचंड जवळ आलं आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही. पण तरीदेखील मोबाईल आणि इंटरनेटचा वापर हा गरजेपुरताच करायला हवा. कारण गरजेपेक्षा त्याचा जास्त वापर किंवा अतिवापर केल्यास त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागू शकतात. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल वापरण्याचे परिणाम वाढताना दिसत आहेत. अर्थात या मोबाईलचा वापर शैक्षणिक कारणांसाठी होत असेल तर चांगलंच आहे. पण मुलांकडून अनेकदा केवळ गेम खेळण्यासाठी मोबाईलचा वापर केला जातो. त्यामुळे मोबाईलच्या बाबतीत विद्यार्थ्यांसाठी काही बंधनं असणं आवश्यक असल्याचं म्हटलं जातं. याचबाबत प्रसिद्ध कीर्तनकार यांनी आपल्या कीर्तनात शाळेत मोबाईल बंदी करण्याची मागणी केली आहे.

## इंदोरीकर महाराज नेमकं काय म्हणाले?

राज्यातील शाळांमध्ये मोबाईल बंदी करण्याची मागणी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार निवृत्ती इंदोरीकर महाराजांनी केली आहे. शाळेत शिक्षकांच्या मोबाईलच्या वापरामुळे शाळांमधील मुलांच्या शिक्षणावर थेट परिणाम होत असल्याचा दावा इंदुरीकर महाराज यांनी केला आहे. त्यामुळे रोज शाळेच्या सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंतच्या वेळेत शाळेत मोबाईल बंदी करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे. अकोल्यात कीर्तनात त्यांनी याबाबतचं वक्तव्य केलं आहे.



## मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असताना प्रशासनामार्फत भेट देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली




जालना प्रतिनिधी /ज्ञानेश्वर साळुंके अंबड :मनोज दादा जरांगे पाटील यांनी विविध मागण्यांच्या अनुषंगाने आज दिनांक 17 सप्टेंबर 2024 पासून मौजे अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेले आहेत.

सदर बाबतीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरचे निवेदन माननीय जिल्हाधिकारी जालना यांच्यामार्फत शासनास पाठवण्यात आलेले आहे. सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याबाबतचे पत्र मनोज दादा जरांगे पाटील यांना देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली..

परंतु त्यांनी निवेदनातील मागण्या जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे लेखी दिले.सदर वेळी तहसीलदार अंबड विजय चव्हाण व नायब तहसीलदार महेंद्र गिरगे तसेच तलाठी विजय जोगदंड उपस्थित होते.सदर उपोषणाच्या अनुषंगाने सर्व यंत्रणांना योग्य त्या सूचना देण्यात आलेले आहे

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन नाकलगाव येथे उत्साहात साजरा

माजलगाव प्रतिनिधी :- माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाकलगाव येथे दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ आणि सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून भारतीय राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण या शाळेचे मुख्याध्यापक माननीय सचिन जोगदंड सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित नाकलगाव ग्रामपंचायत चे सरपंच श्री मारुती विटेकर सर उपसरपंच श्री रमेश झोडगे शाळेतील शिक्षक



माननीय हनुमंत कटारे सर माननीय विनोद काळे साहेब श्रीमती कुलकर्णी मॅडम श्रीमती माने मॅडम माननीय जाधव सर शालेय शिक्षण व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष शेख इजास, बळीराम जाधव बाळू आर्सूळ ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग झोडगे राधाकिसन शिंदे प्रवीण पोटभरे चंद्रकांत झोडगे बंडु शेळके रामहरी शिंगारे यांच्यासह विजय झोडगे प्रल्हाद झोडगे सुग्रीव गवळी नाना झोडगे शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री हनुमंत कटारे सर यांनी केले

# 302 मधील आरोपीची पुराव्या अभावाचे कारण देत मुक्तता..

## फेर तपासणी करण्याची मयताच्या पत्नीची मागणी.. दत्तात्रय केदार खून



केज (प्रतिनिधी): तालुक्यातील गप्पेवाडी येथील बहुचर्चित असणारे दत्तात्रय केदार खून प्रकरणाला आता वेगळेच वळण लागल्याचे दिसून येत आहे. यातील आरोपी असलेल्या विकास मधुकर केदार याची पुराव्याच्या अभावाचे कारण देत निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणामुळे मयताची पत्नी असलेल्या सखुबाई दत्तात्रय केदार या महिलेची पायाखालची जमीनच सरकली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, मयत दत्तात्रय संदीपान केदार याचा (दि. २७ मार्च २०२४ ) रोजी मुख्य आरोपी असलेल्या विकास मधुकर केदार त्यांचा मेहुणा परमेश्वर चौरे व विकास मधुकर केदार यांनी संगनमत करून विडा परिसरात ट्रक घालून खून केला होता. याच्या विरोधात मयताची पत्नी फिर्यादीदार सखुबाई दत्तात्रय केदार यांनी आरोपींच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. आरोपींना तब्बल एक महिन्याच्या नंतर पकडुन त्यांच्या मुसक्या आवळण्यात यश आले होते. दरम्यान, काही दिवसानंतर खुनाचा गुन्हा नोंद असलेला आरोपी विकास मधुकर केदार याचा पुराव्या अभावाचे तसेच फिर्यादीदारला विचारात न घेता सुटका केली आहे. याची माहिती मिळताच मयताची पत्नी असलेल्या सखुबाई दत्तात्रय केदार यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन देत याची फेर तपासणी करण्याची मागणी केली आहे. तसेच सदर आरोपी विकास मधुकर केदार याची पुनः चौकशी करून कारवाई करण्यात यावी अन्यथा आत्मदहनाचा इशारा सखुबाई दत्तात्रय केदार यांनी निवेदनात दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com